# ९. विविध खेळ

**उद्दिष्टे**

१) भारतीय शालेय क्रीडा प्राधिकरणाने समाविष्ट केलेल्या सर्व खेळांची अद्ययावत माहिती उपलब्ध होणे.

२) सर्व समाविष्ट खेळांच्या नियमांचा अभ्यास करणे.

३) सर्व समाविष्ट खेळांची क्रीडाकौशल्ये विकसित करणे.

४) खेळांच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकसित करणे.

५) सर्व खेळांच्या क्रीडा स्पर्धांची माहिती होणे.

मानवी संस्कृती व खेळ यांचे नाते फार जुने आहे. त्या त्या देशप्रदेशांच्या संस्कृतीनुसार तिथले खेळ खेळले जातात. पूर्वीच्या काळी खेळ हे केवळ करमणुकीसाठी किंवा शौर्याची परीक्षा घेण्यासाठी खेळले जात असत, पण आज त्याची जागा व्यवसायाने घेतली आहे. खेळ म्हटले की आपोआपच येते ती खिलाडूवृत्ती! खेळातून खेळ, खिलाडूवृत्ती आणि नीतिमूल्ये यांचे संरक्षण होते. क्रीडा-पत्रकार हेन्री ग्रॅटलँड राईस म्हणतात, ''खेळात तुम्ही हरता किंवा जिंकता याला महत्त्व नाही तर तुम्ही कशा प्रकारचा खेळ करता याला जास्त महत्त्व आहे.''

भारतीय क्रीडाक्षेत्राचा विचार केला तर क्रिकेट वगळता इतर क्रीडाक्षेत्रांकडे वळण्यात युवकांना अजिबात रस नाही असे म्हटले जाते. परंतु खेळाचे महत्त्व हे पदके जिंकून देशाची प्रतिमा उंचावणे इथपर्यंतच मर्यादित नाही तर वैयक्तिक जीवनातही खेळांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. निकोप शरीरातच निकोप मन असू शकते हे समजल्यावर, शरीर निकोप व सुदृढ ठेवण्यासाठी माणसे धडपडू लागली आणि निकोप शरीराचा एक मार्ग खेळाच्या पटांगणातून जातो हे समजल्यावर त्यांना खेळ हवेहवेसे वाटू लागले. जीवनातील सर्वच क्षेत्रांमध्ये शिस्त अनिवार्य आहे. तशी ती खेळातही आवश्यक असते. खेळाने व्यायाम होतो, शरीर बळकट होते. पण खेळातील शिस्त जीवनालाही वळण देते.

आज भारतामध्ये जवळपास अनेक क्रीडा प्रकार खेळले जातात. त्यांच्या अनेक अधिकृत संघटना या राज्य व राष्ट्रीय स्तरावर कार्यरत आहेत. भारतीय शालेय क्रीडा प्राधिकरणाद्वारे त्यातील कांही खेळांना अधिकृत मान्यता दिली गेली असून त्यांचा सदर वर्षाच्या वेळपत्रकामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. असे असले तरी दर वर्षी खेळाच्या यादीमध्ये बदल झालेला दिसून येतो. त्यात काही खेळांचा समावेश केला जातो तर काही खेळांची मान्यता काढून घेतली जाते.

कुठलाही खेळ अथवा क्रीडा प्रकार शिकत असताना त्याला नियमांचा आधार असला पाहिजे तरच ते खेळ स्पर्धात्मक क्रीडा प्रकारात टिकू शकतात.

खेळाच्या नियमांबरोबरच, क्रीडा कौशल्य व शारीरिक घटकाचा विकासही खेळाच्या माध्यमातून केला जातो. खेळाद्वारे व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व घडवण्यात मदत होते. खेळ हे फक्त मनोरंजनाचे साधन नसून त्याकडे व्यावसायिक दृष्टिकोनातून पाहिले गेले पाहिजे. त्यासाठी विविध स्तरांवर आयोजित क्रीडास्पर्धांमध्ये भाग घेऊन खेळातील क्रीडा कौशल्य वृद्धिंगत केले पाहिजे.

**सूचना :**

पुढील यादीमध्ये काही खेळ व क्रीडा प्रकारांचा समावेश केला असला तरी क्रीडा शिक्षकाने भौगोलिक परिस्थिती, उपलब्ध सोई सुविधा आणि क्रीडा साहित्य यांचा विचार करून खेळ व क्रीडा प्रकार घ्यावेत. त्याचप्रमाणे परंपरागत मनोरंजनात्मक खेळांचा ही समावेश यात केला जावा. त्यामुळे येथील संस्कृती व परंपरा जोपासण्यास मदत होईल. **वर्गीकरण करण्यात आलेल्या खेळ व क्रीडा प्रकारांची माहिती Q.R. Code मध्ये पाहता येईल.**

## काही खेळ व क्रीडाप्रकारांची यादी

### १. आक्रमणात्मक खेळ

१. फुटबॉल
२. हॅण्डबॉल
३. बास्केटबॉल
४. हॉकी
५. कबड्डी
६. नेटबॉल
७. रग्बी
८. रोलबॉल
९. रोलर हॉकी

### २. नेट गेम्स

१. बॉलबॅडमिंटन
२. व्हॉलीबॉल
३. शूटिंग बॉल
४. थ्रो बॉल
५. टेनिस
६. बॅडमिंटन
७. सॉफ्ट टेनिस
८. टेबल टेनिस
९. सेपाक टकराव
१०. टेनिक्वाइट

### ३. द्वंद्वात्मक खेळ

१. कुस्ती
२. वुशू
३. ज्युदो
४. कराटे
५. बॉक्सिंग
६. किकबॉक्सिंग
७. सिकई मार्शल आर्ट
८. तलवार बाजी
९. युनीफाईट
१०. तेंग सु-डो
११. कुडो
१२. मल्लखांब
१३. आष्टेडो आखाडा
१४. तायक्वांदो

### ४. स्ट्रायकिंग गेम्स

१. बेसबॉल
२. क्रिकेट
३. सॉफ्टबॉल
४. कॅरम
५. स्क्वॅश
६. मॉन्टेक्सबॉल

### ५. टार्गेट गेम्स

१. आर्चरी
२. रायफल शूटिंग

### ६. लिफ्टिंग गेम्स

१. वेटलिफ्टिंग
२. पॉवरलिफ्टिंग

| ७. टॅग गेम्स | ८. इतर खेळ |
| --- | --- |
| १. खो-खो | १. ॲथलेटिक्स |
| २. आट्यापाट्या | २. जलतरण |
| ३. डॉजबॉल | ३. जिम्नॅस्टिक्स |
| | ४. योगासन |
| | ५. बुद्‌धिबळ |
| | ६. मॉडर्न पेंटॅथलॉन |
| | ७. स्केटिंग |
| | ८. सायकलिंग (ट्रॅक आणि रोड) |









